स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

कला विद्याशाखेअंतर्गत

मराठी विषयातील पीएच्. डी. पदवी करिता सादर केल्या जाणाऱ्या प्रबंधाचा

संकल्पित आराखडा

"मराठी आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्री जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास (१९८०-२०००)"

संशोधक

आसाराम भाऊराव आवचार

प्रियदर्शनी कॉलनी ,सेलू

ता. सेलू , जि. परभणी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आनंद गो. इंजेगावकर

सहयोगी प्राध्यापक,मराठी विभाग,

स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी

ता. पाथरी , जि. परभणी

प्रास्ताविक :-

इंग्रजी राजवटीसोबत भारतात पाश्चात्य आधुनिक संस्कृती आणि सभ्यता आली. तिच्या साहाय्याने या देशाला प्राचीन आणि मध्ययुगीन मुल्यांच्या आजारापासुन बाहेर काढावे. वर्णव्यवस्था,जातीसंस्था,दैववाद,स्वर्ग नरकाच्या खुळ्या कल्पना स्त्रियांवर होणारे अत्याचार याला मूठमाती मिळावी. प्राचीन विषमतावादी मूल्यांच्या विशिष्ट चौकटीतुन भारतीय समाज बाहेर यावा. त्याची प्रगती व्हावी. त्याला त्याचे अस्तित्व कळावे.त्याला त्याच्या मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व कळावे. यासाठी पुरोगामी समाजसुधारकाची धडपड होती. या धडपडीतुनच भारतात सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा उदय झाला. म.जोतीराव फुले यांच्यापासुन सुरु झालेली सामाजिक परिवर्तनाची चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या रुपात आधिक व्यापक झाली.सर्व भारतीय समाज जागृत होऊन एकसंघ व्हावा असे म.जोतीराव फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढाऊ नेतृत्वाने या चळवळीने अनेक सामाजिक लढे उभारले. याच काळात 'मुकनायक','जनता','प्रबुध्दभारत' व 'बहिष्कृतभारत' या सारख्या नियतकालीकातुन प्रबोधनाचे युग सुरु झाले.बाबासाहेबांनी १९४५साली स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातुन मुंबई आणि औरंगाबाद या ठिकाणी महाविद्यालये सुरु झाली. या महाविद्यालयामध्ये अस्पृश्य युवक मोठ्या प्रमाणावर शिकू लागले. त्यामुळे तरुणमने एकत्र येऊ लागली. विचारविनीमय करु लागली. आपली सुख-दुःखे एकमेकांना सांगु लागली. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात अस्पृर्श युवक संघटीत झाला. एवढ्या मोठ्या प्रमाणावर एकत्र येण्याचे भाग्य अस्पृश्य समाजाला यापुर्वी कधीही लाभले नव्हते. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या रुपाने लाभले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली विविध भाषणे त्यांनी लिहलेले असंख्य लेख आणि त्यांनी लिहीलेल्या वैचारीक ग्रंथाच्या परिणामातुन मराठीमध्ये प्रारंभीच्या काळात 'आंबेडकरी जलसे' उदयाला आले.त्यांनी समाजामध्ये प्रबोधन करण्याचे फार मोठे मोलाचे कार्य केले. त्यातुन सुलभ आणि रंजकतेने अस्पृश्यांच्या अस्मितेला जागृत करण्याचा प्रयत्न झाला. या जलश्य़ांच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विचार आहेत . याच प्रेरणेतुन पुढे कविता,कथा,कादंबरी,वैचारिक लेखन ,नाटक अशा विविध वाङ्मय प्रकारातुन लेखन होऊ लागले.

ज्या परंपरेने या समाजाला पिढ्या न् पिढ्यापासुन शिक्षणाचा हक्क नाकारला होता. त्यांच्या प्रगतीला आडकाठी घातली होती. प्रगती घडवुन आणण्याची संधी नाकारली .त्यांच्यावर उपेक्षित जीवन लादले. अशा समाजाचे चित्रण १९६० नंतरच्या मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. अशा प्रकारच्या साहित्याला 'दलित साहित्य' असे नाव प्रारंभीच्या काळात दिले गेले. पुढे खुप काळ ते याच नावाने ओळखले जाऊ लागले. 'दलित' ही संकल्पना व्यापक विस्ताराने मांडण्याचा प्रयत्न नामदेव ढसाळ, बाबुराव बागूल, पु.ल. देशपांडे , दत्ता भगत, डॉ.यशवंत मनोहर यासारख्या मान्यवरांनी केलेला आहे. ही मांडणी मान्यता पावलेली आहे, परंतु अलीकडील काळात या संकल्पनेची पुनर्मांडणी अनेकजण करत आहेत. 'दलित' ही संकल्पना दुबळे, पीडित हीनदीन,अस्पृश्य अशी अपमान सुचक असल्यामुळे ,यापुढे आपण स्वतःला 'दलित' का समजावे? हा विचार पुढे येऊ लागला.या साहित्याची मुळ प्रेरणाच जर आंबेडकरी विचाराची असेल तर या संपुर्ण साहित्याला 'दलित साहित्य' असे न म्हणता 'आंबेडकरी साहित्य ' म्हणावे असा विचार अलीकडील काळात जोर धरु लागला.अशी भुमिका डॉ.यशवंत मनोहर या साहित्यिक विचारवंतांने 'आंबेडकरवादी साहित्य' या ग्रंथात मांडलेली आहे. तर काही साहित्यिक याला

'बोधीसाहित्य' असे म्हणावे असा आग्रह धरतांना दिसतात. प्रस्तुत अभ्यासकास सदरील साहित्य प्रकारास 'आंबेडकरवादी साहित्य 'असे म्हणणेच योग्य वाटते.

१९४७ साली भारत देश स्वतंत्र होऊन १९५० साली देशाने संविधान स्विकारले.भारतीय राज्यघटनेने एक नवे सुंदर राष्ट्रस्वप्न भारतापुढे ठेवले. परंतु विषमता आणि समता हा अंतर्विरोध आणखीच विषारी होऊ लागला. येथील समाजाला भुतकाळ मागे ओढत होता आणि संविधान पुढे नेऊ इच्छीत होते. राज्य घटनेने सर्वांना समान अधिकार दिले हे खरे ; पण मनु या गोष्टीला जाळण्याचे कार्य करीतच होता . नवजागृत माणसे संविधानानुसार जगु पाहत होती आणि मनु त्यांना मध्ययुगात ढकलत होता.मनु त्यांना संविधानानुसार जगु देत नव्हता. यातुन मानवी अस्मितेची जाण आलेल्या प्रतिभा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा उराशी कवटाळुन अंधार आणि प्रकाश या अंतर्विरोधावर,या सांस्कृतिक संघर्षावर भाष्य करु लागल्या. ही गोष्ट पारंपरिकांना मान्य झाली नाही. त्यांनी अन्याय ,अत्याचार सुरुच ठेवले. यातुनच आंबेडकरी साहित्याचा उदय झाला.कादंबरी, कविता, नाटक, स्वकथन, वैचारीक लेखन आणि कथा हे आंबेडकरी साहित्याचे मुख्य प्रकार आहेत. कथा या वाङ्मय प्रकारात आंबेडकरी कथाकारांनी मोठ्याप्रमाणात लेखन केले आहे.

१९८० नंतर प्रखर आंबेडकरी जाणिवेने लिहील्या गेलेले पुढील काही कथासंग्रह पाहिले म्हणजे आंबेडकरी कथा किती महत्त्वाची आहे, हे लक्षात येईल.

अ.क्र.	कथासंग्रहाचे नांव	लेखकाचे नांव
१	उद्रेक , बेगड	योगीराज वाघमारे
२.	येळकोट,वारसदार, वाटा आडवाटा	वामन होवाळ
३.	महासंगर	अविनाश डोळस
४.	दावण, सरणझळा ,दरी	रविचंद्र हडसनकर
५.	धग, घुसमटणी	किशोर घोरपडे
६.	वादळवाटा, बारव, दानत,	ज्ञा.रा.पंडित
७.	तळभारत	अनंत राऊत
८.	मुडदे	जगदीश कदम

केशव मेश्राम, योगेंद्र मेश्राम, अर्जुन डांगळे, एकनाथ सोनवणे, गणेश सोनावळे यांचे कथासंग्रह ही या संदर्भाने महत्त्वाचे आहेत.

वरिल कथासंग्रहाची व लेखकांची नावे प्रातिनिधीक रुपात आलेली आहेत.आणखी बरेच कथा संग्रह प्रत्यक्ष संशोधन करतांना उपलब्ध होतील. ज्या आंबेडकरी कथासंग्रहामधुन प्रखर आंबेडकरी विचार मांडलेले आहेत. यावरुन त्यांची गुणवत्ता व वाङ्मयीन मुल्यमापनाचा दर्जा ठरवता येईल.

आंबेडकरी कथा ही दलित, भटके -विमुक्त, स्त्रिया अशा शोषित, पीडीत समाजाचे वर्णन करणारीच कथा नाही तर संपुर्ण समाजगटाचे चित्रण या कथेत आलेले आहे. आंबेडकरी साहित्याचा जन्मच साहित्य किंवा 'कलेसाठी कला ' या भावनेतुन झालेला नसुन जाणीवेच्या अपरिहार्यतेतुन झाला. त्यामुळे आंबेडकरी कथेत समाजाच्या दुःखांना वाङ्मयीन स्वरुप प्राप्त झाले. समतेच्या मार्गातील जो विषमतेचा अडथळा आहे. तो दुर करण्याचे कार्य आंबेडकरी कथेने स्विकारले.

विषय निवडीची भुमिका :-

कथा हा साहित्य प्रकार आंबेडकरी साहित्यातील महत्वाचा प्रकार आहे. १९६० ते १९८० या कालखंडातील आंबेडकरी कथेचा संशोधनात्मक अभ्यास कमी अधिक प्रमाणात झालेला आहे, परंतु १९८० नंतर निर्माण झालेल्या आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्री जीवनाचा अभ्यास म्हणावा तसा झालेला नाही म्हणुन **"मराठी आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्री जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास (१९८०-२०००)"** असा विषय घेऊन संशोधन करणे मला आवश्यक वाटले. या प्रबंधातून १९८० नंतरच्या सर्वच आंबेडकरी कथेतून आलेल्या ग्रामीण स्त्री जीवनाचा अभ्यास करणे शक्य नाही, तरी पण संशोधनामध्ये सूत्रबध्दता यावी म्हणुन वरिल कालखंडाची निवड केलेली आहे.या कालखंडातील महत्त्वाच्या कथाकारांच्या कथांचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१. प्रस्थापित मराठी साहित्य आणि आंबेडकरी साहित्य यांचे मुल्यमापन करणे.

२. आंबेडकरी साहित्याच्या उदयाची कारणे शोधणे.

३. आंबेडकरी साहित्याच्या मुळ प्रेरणेचा शोध घेणे.

४. आंबेडकरी कथेतील सामाजिकतेचा शोध घेणे.

५. आंबेडकरी कथेतून आलेल्या ग्रामीण जीवनाचा शोध घेणे.

६. आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्री जीवनाचा शोध घेणे.

७. समाजातील संघर्ष आणि आंबेडकरी कथा यांचे नाते शोधणे.

८. आंबेडकरी कथेतील सांस्कृतिक जीवनाचा शोध घेणे.

९. आंबेडकरी कथेतील भाषाशैलीचा शोध घेणे व तीचे वेगळेपण शोधणे.

१०.आंबेडकरी कथेतील विद्रोहाचे मुल्य तपासणे.

११.आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्रिजीवन चित्रणाचे वाङ्मयीन मुल्यमापन करणे.

संशोधन पध्दती :-

"मराठी आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्री जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास (१९८०-२०००)" या विषयाच्या संशोधन कार्यासाठी वर्णणात्मक / विश्लेषणात्मक आणि समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

प्रकरणशः विभागणी :-

प्रकरण क्र. १

आंबेडकरी कथाः उगम, विकास आणि प्रेरणा .

या प्रकरणात आंबेडकरी कथेचा उगम, आंबेडकरी कथेचा विकास आणि आंबेडकरी कथेच्या प्रेरणा इत्यादींचा विवेचक अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण क्र.२

आंबेडकरी कथेतील ग्रामीण जीवन विश्व

या प्रकरणामध्ये आंबेडकरी कथेतून आलेल्या ग्रामीण जीवन विश्वाचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. ज्यामध्ये सामाजिक ,सांस्कृतिक ,आर्थिक , राजकिय आणि भौगोलीक जीवन अभिप्रेत आहे.

प्रकरण क्र. ३

आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्री जीवनाचे स्वरुप

विविध पातळ्यावर चित्रीत झालेल्या आंबेडकरी कथेतील समग्र ग्रामीण स्त्री जीवनाचा सखोल अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे. भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान व आंबेडकरी कथेमधून ग्रामीण स्त्री जीवनाला कथाकारांनी दिलेला न्याय याचा अभ्यास येथे अपेक्षित आहे.

प्रकरण क्र. ४

आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्री चित्रणाचे वाङ्‌मयीन मुल्यमापन

आंबेडकरी कथेमधून चित्रित झालेले ग्रामीण स्त्री जीवन ज्या माध्यमातुन अभिव्यक्त झाले आहे. त्या सर्व माध्यमांचे वाङ्‌मयीन मुल्यमापन या प्रकरणात करावयाचे आहे. वाङमयीन कसोट्यांचा आधार घेऊन आंबेडकरी कथाकारांच्या कथांमधील ग्रामीण स्त्री जीवन चित्रणाचा भाषिक, सांस्कृतिक दर्जा इथे तपासायचा आहे.

प्रकरण क्र. ५

भाषाशैली

आंबेडकरी कथेमधून शोषित, उपेक्षित,संधीवंचित समुहगटाचे जीवनविश्व मोठ्या प्रमाणात अभिव्यक्त झाले असल्यामुळे तिची भाषा प्रस्थापित मराठी कथेपेक्षा वेगळी बनली आहे. आंबेडकरी कथेच्या भाषाशैलीचे नेमके वेगळेपण कोणते याचा शोध या प्रकरणात घ्यायचा आहे. त्याचबरोबर आंबेडकरी कथेने मराठी साहित्याचे दालन कसे समृध्द केले याचा शोध ही या प्रकरणातून घ्यायचा आहे.

प्रकरण क्र.६

उपसंहार

"मराठी आंबेडकरी कथेतील ग्रामीण स्त्री जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास (१९८०-२०००)" या विषयाच्या अनुषंगाने वरिल प्रकरणातुन जे निष्कर्ष हाती लागणार आहेत .त्याचा उहापोह या समारोपाच्या प्रकरणात करावयाचा आहे.

सदरिल विषयाच्या प्रबंध लेखनाचा स्थुल आराखडा संशोधक विद्यार्थ्याच्या आतापर्यंतच्या अभ्यासाला अनुलक्षून सादर केला आहे. आंबेडकरी कथेचा अभ्यास करीत असताना आणखी काही वेगळे संदर्भ हाती लागले तर या आराखड्यामध्ये आवश्यक तो बदल केला जाऊ शकतो.

मार्गदर्शक	**संशोधक**
प्रा. डॉ.आनंद गो. इंजेगावकर सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी. जि.परभणी.	आसाराम भाऊराव आवचार प्रियदर्शनी कॉलनी,सेलू ता.सेलू जि. परभणी.

अभ्यास सामुग्री

अ.क्र.	ग्रंथनाम	लेखकनाम	प्रकाशन
१.	निळी पहाट	रा.ग. जाधव	श्रीविद्या प्रकाशन, पुणे
२.	मराठवाड्यातील साहित्य	संपा.प्रल्हाद लुलेकर सतिश बडवे	कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
३.	आंबेडकरवादी साहित्य	डॉ.यशवंत मनोहर	भीमरत्न प्रकाशन,नागपूर
४.	मूल्यशोध	मोतीराम कटारे	स्वरुप प्रकाशन,औरंगाबाद
५.	दलित साहित्य:आजचे क्रांती विज्ञान	बाबूराव बागूल	दिशा प्रकाश, नाशिक
६.	दलित साहित्य दिशा आणि दिशांतर	दत्ता भगत	अभय प्रकाशन, नांदेड
७.	दलित साहित्य चिकित्सा	डॉ.सदा कऱ्हाडे	स्वरुप प्रकाशन,औरंगाबाद
८.	साहित्यः प्रकृती आणि प्रवृत्ती	डॉ.गंगाधर पानतावणे	स्वरुप प्रकाशन,औरंगाबाद
९.	दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप	डॉ.वसंत डोळस	दिलीपराज प्रकाशन,पुणे
१०.	दलित साहित्य उद्गम आणि विकास	डॉ.योगेंद्र मेश्राम	श्री मंगेश प्रकाशन,नागपूर
११.	डॉ.बाबासाहेब आंबेडकर	धनंजय कीर	पॉप्युलर प्रकाशन,मुंबई
१२.	अधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास	डॉ.वसंत बिरादार	कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
१३.	प्रदक्षिणा खंड दुसरा		कॉन्टीनेन्टल प्रकाशन

मार्गदर्शक

प्रा. डॉ.आनंद गो. इंजेगावकर
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय,
पाथरी. जि.परभणी.

संशोधक

आसाराम भाऊराव आवचार
प्रियदर्शनी कॉलनी,सेलू
ता.सेलू जि. परभणी.